# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक: ०६/०२/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०६/०२/२०१६ रोजीच्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा शनिवार, दिनांक ०६/०२/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री.मोहन हरीराम रामनानी (लास्सी) | सभापती |
| २ | श्री. रविंद्र गोविंद महाजन | सदस्य |
| ३ | श्री परमानंद किशनचंद हिंदुजा | सदस्य |
| ४ | श्री संजय किसन सदावर्ते | सदस्य |
| ५ | श्री भरत बळीराम खरे | सदस्य |
| ६ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी | सदस्य |
| ७ | श्री. नरेश सुगनोमल दुर्गानी | सदस्य |
| ८ | श्री होमनारायण एस. वर्मा | सदस्य |
| ९ | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा | सदस्य |

तर

**खालील सदस्य सभेस अनुपस्थित होते.**

१. सभापती, स्थायी समिती तथा पदसिध्द सदस्य, श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्री राजू काशिराम चिकणे, ३. श्री. रामजीत पाल, ४. श्री कुलदीप गुरूदाससिंग ऐलसिंघानी

**खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित होते.**

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. जमिर लेंगरेकर, उप–आयुक्त, वाहन
४. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
६. श्रीमती छाया ढगळे, लिपिक, लेखा विभाग

**तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.**

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गीस खान
३. श्री. संजय मुकणे

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणून आसनस्थ होते.

दुपारी १२.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** सन २०१५–१६ चे सुधारीत व २०१६–२०१७ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणे.

---

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>बस बद्दल काय झाले? मागील सभेत बस खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव होता, त्याबद्दल काय झाले? काय चर्चा झाली होती? त्याबाबत मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय का आला नाही?

<u>महापालिका सचिव:–</u>बजेटची सभा आहे, त्यामुळे इतिवृत्त कायमचा विषय आला नाही. बजेटमध्ये फक्त बजेटबद्दलच बोलले जाते. आपणाकडुन मागील सभेत बस खरेदीबाबतचा ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर कोणतीही सभा लागली नाही.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>ठिक आहे, एवढेच बोलायचे होते. डीझेल, सीएनजीबद्दल कायम करुन टाका त्यामध्ये.

<u>श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>जसा ठराव झाला तसाच करणार.

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा:–</u>मागील १५–१६ चे काय अणि १६–१७ मध्ये काय आहे? यावर्षी परिवहनवर किती वाढविण्यात आले?

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:–</u>मागील अर्थसंकल्प ११ कोटीचे होते. त्यात जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत ७ कोटी, सभासद व इतर खर्च १० लाख आहेत.

<u>श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>१ कोटी १५ लाख आहे, १८ कोटी कोठुन काढले तुम्ही?

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–</u>यावेळी किती वाढविले?

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :–</u>यावेळेस बसेसचे कमी केले.

<u>श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>याबाबत फक्त हजार रुपये लिहिले आहेत.

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :–</u>१० लाख लिहिले आहेत साहेब.

<u>श्रीमती छाया जावळे, लिपिक, लेखा विभाग :–</u>होय साहेब, ते १० लाखाचे आकडे आहेत.

<u>श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>हजारात बरोबर आहे का? लाखात लिहीले पाहिजे ना?

**यावेळी मा. आयुक्त श्री. मनोहर हिरे यांनी सभागृहात प्रवेश केला व आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ झाले.**

<u>आयुक्त, श्री मनोहर हिरे :–</u>२५ लाखाचे हजारात आकडे लिहिले आहेत.

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त:–</u>हजाराच्या ऐवजी लाखात म्हणायला पाहिजे होते. लेखा विभागाचे कोण अधिकारी आहेत का?

<u>श्रीमती छाया जावळे, लिपिक, लेखा विभाग :–</u>पाच शुन्य काढले तर लाख होतील.

<u>आयुक्त, श्री मनोहर हिरे :–</u>आता महासभेचा ठराव झाल्यावर आपण टेंडरींग करणार आहोत. मार्च महिन्याअगोदर आपण ५ बसेस आणणार आहोत. त्याची तरतुद आहे का? पुढील आर्थिक वर्षात काय काय तरतुदी केल्यात श्री. जमीर साहेब, आपण दिले सर्वांना स्पष्टीकरण? आपण दया स्पष्टीकरण.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त:– परिवहन सेवा उत्पन्न २५००, बस खरेदी अनुदान (अमृत योजना)१५००० हे उत्पन्न आहे. त्यात खर्च म्हणजे परिवहन सेवा देखभाल दुरूस्ती व इतर खर्च १५०००, सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते १०००, सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च १०००, बस खरेदी व बस डेपो खर्च २०००० असा आहे. ३७००० चा अर्थसंकल्प आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–लाखात नाही, हजारात म्हटले आहे.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–३ शुन्य वाढविले पाहिजे. अमृत योजनेत आपल्याला बस खरेदी करता येईल. त्यासाठी १ कोटी ६० लाख तरतुद केली आहे. वाहन भत्ता हा मागील वर्षी ९ कोटी ६० लाख होते. आता २०१६–२०१७ मध्ये १ कोटी आहे. यात सरासरी एक बसला १६ लाख तर १० बस खरेदीसाठी एकुण खर्चाची तरतुद करावी. यात दुरुस्ती, मेंटेनन्स, कंडाक्टर, देखभाल यासाठी ५० लाख मानधनावर १२ हजाराच्या वर व १ लाख २० हजार करता येईल. तीन ड्रायव्हर व कंडाक्टर यात एका बसससाठी २ म्णजे ६६,१२,८९२ एवढा खर्च असून मानधन खर्च मेंटेनन्ससाठी ५० लाख व बस खरेदीसाठी किमान १ बसला २० लाख अशा १० बसेस खरेदी म्हणजेच २ कोटीची तरतुद करावी लागेल. कमी पडल्यास दुस–या हेडमधुन खर्च करता येईल किंवा थोडेसे वाढवावे लागेल.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–पुढील वर्षी १० बसेस करण्यात येईल.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–बस खरेदी म्हटली तर त्यावर मेंटेनन्स आलाच. देखभाल दुरुस्ती आलीच. ते खर्चाच्या तपशिलात नमुद केले आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–बस खरेदी व देखभाल दुरुस्ती खर्चात वाढ करता येईल.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–बस खरेदी व देखभाल दुरुस्ती खर्च वाढविता येईल.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–परिवहन सेवेत दुरुस्तीचा खर्च ५० लाख आहे का? जर मानधनावर दुरुस्ती देखभालीसाठी दिले तर किती खर्च येईल?

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–तसे केले तर १२ हजाराच्यावर खर्च जातो.

श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त :–३ शिफ्ट ठेवाव्या लागतील जर मानधनावर कर्मचारी घेतले तर, ३ ड्रायव्हर व ३ कंडक्टर ठेवावे लागेल.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–नाही, २ शिफ्ट कराव्या लागतील.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:– १५ X २ = ३० ड्रायव्हर ठेवावे लागेल, एक महिन्याचा पगार १२ हजार रुपये दयावा लागेल.

श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त, :–असे केले तर महिन्याला ६४ हजार होतात.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–८ लाख खर्च होणार, देखभाल दुरुस्तीसाठी २ कोटी करा नाहीतर १ कोटी ५० लाख तरतुद केली पाहिजे. बस खरेदीसाठी ५० करा. एका बसेसची किंमत काय आहे?

श्री. यशवंत सगळे प्र. वाहन व्यवस्थापक:–.... आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–जर या लेखाशिर्षात रक्कम कमी पडेल तर दुस–या शिर्षातुन रक्कम ठेवा.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–साहेब, ८ कोटी वाढवुन करा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>दुस–या शिर्षातुन खर्च करता येईल. या वर्षात आपण ५ बसेस खरेदी करु व पुढील वर्षात १० खरेदी करु.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>आता १० बसेसच खरेदी करणार आहोत. पुढील वर्षात सुध्दा १० खरेदी करता येईल, लोकसंख्येच्या हिशोबाने ५ बस तर काहीच नाही. जर सलगपणे जनतेला सुविधा जरी दिल्या तरी तेवढया बसेस जनतेला पुरणार नाही. आम्हांला लोक विचारत असतात की आपण परिवहन समितीमध्ये बसून काय करत आहात? जर ५ ऐवजी मागील वेळेप्रमाणे १० केले तर बरे होईल आमची ही विनंती असेल. सुरुवातीला १० बसेस ठेवा व नंतरच्या वर्षी सुध्दा आपण १० बस ठेवु शकतो.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>माझे म्हणणे असे आहे की, मार्चच्या पहिले १० बसेस खरेदी करण्यात याव्यात. आणि आपण ही योजना यशस्वीपणे राबवु या.

<u>सभापती, श्री. मोहन रामनानी :–</u>जर महापालिका बससेवा चालवेल तर यशस्वी होईल.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>त्याने एक फरक पडेल की जसे बस स्वत: धनी चालवत असेल जसे आटो रिक्षा असते ती बरोबर चालत असते. त्यास मेंटेनन्सशी काय मतलब पडते? माझे काय जाते? तर मग प्रशासनाने ठरवायचे आहे की बसेस आपण स्वत: चालवायचे की खाजगी ठेकेदारास दयाचे? ठेकेदार तेवढे सांभाळणार नाहीत कारण त्यांची बस नसणार, त्यांचे पैसे लावलेले नसणार, हाच म्हणण्याचा अर्थ आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–</u>ठेक्यावर दिल्यानंतर महापालिका त्याच्याकडुन रॉयल्टी घेवु शकते.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>पुर्वीच्या अटी व शर्ती आपणांस माहित आहे. काय झाले ते आपणांस माहित आहे. खाजगीवाल्यांना दिले ते आपण भोगले आहे, जनतेचा फायदा कमी झाला व त्या ठेकेदाराचा जास्त झाला. तर त्यात रॉयल्टी मिळाली नाही. आरटीओवाल्यांकडे गेले तर ते सुध्दा तक्रारी देतील की त्यांना मिळाले नाही. हया गोष्टी जर झाल्या तर त्यात जनतेला त्रास होतो.

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–</u>नाही, पुर्वी असे होते ना की बस तो ठेकेदारच खरेदी करेल, प्लॅनिंग सुध्दा त्याचीच असेल. आता जर आपण ठेक्यावर दिले तर त्याची देखभाल करणे हे प्रशासनाच्या हातात असेल. त्यासाठी वाहन व्यवस्थापक आहे.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>माझे म्हणणे असे नाही, माझे असे म्हणणे आहे, आधी लोकसंख्या पहा, त्यानुसार किती बस असायला हव्यात, दुसरे म्हणजे पुर्वी महापालिकेचा एक पैसा सुध्दा नव्हता, आता तसे नाही. याचा फायदा जर जनतेला मिळाला नाही तर पब्लीकच्या भल्यासाठी, खाजगी देण्यात फायदा काय होईल? प्रत्यक्षात काय होते याचा आपणांस अनुभव आहे. तर मग मी विनंती आहे की, महापालिका चालवेल तर फारच छान आणि जर नाही चालवेल तर त्या ठेकेदारावर एक उप–आयुक्त दर्जाचा अधिकारी निरीक्षणासाठी ठेवावा, काय होत आहे, काय नाही होत. तर येथिल उप–आयुक्त यांना एक अतिरिक्त पदभार दिला जावा जेणेकरुन बसेसचेही नुकसान होणार नाही, महापालिकेचेही नुकसान होणार नाही, जनतेचेही भले होईल.

<u>सभापती, श्री. मोहन रामनानी :–</u>महापालिका चालवेल तर फायदा होईल. त्यास अटी शर्ती लागु कराव्यात.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–</u>परंतु तसे केल्याने काहीच फायदा होत नाही. ते फक्त करारनाम्यावरच राहते व प्रत्यक्षात काहीच होत नाही.

<u>सभापती, श्री. मोहन रामनानी :–</u>तर महापालिकेच्या देखरेखीखाली काम होईल.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा:–</u>माझे तेच म्हणणे आहे की, महापालिका जर ठेक्यावर देत असेल तर त्या ठेकेदारावर नजर ठेवण्यात यावी. जर करारात आपण लिहितो तर तशी अंमलबजावणी झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–</u>जीपीएस सिस्टम चालु करा.

**सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–** सदर ठेका मागील प्रमाणे न देता उप–आयुक्त यांच्या देखरेखीत परिवहन सेवा सुरु करावी यावर प्रशासनाची म्हणजेच महानगरपालिकेची नजर असावी. प्रशासनाचा खास अधिकारी ठेवणार तर बरे होईल.

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :–**जीपीएस या सिस्टम व्यवस्थेवर ८ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. खाजगी बस चालविल्यास अहमदनगरवाले तयार असून सध्या उल्हासनगर शहरामध्ये व नंतर कल्याण अंबरनाथ बदलापूर अशा १४ मार्ग मंजुर आहेत.

**सदस्य श्री. रविंद्र महाजनी :–**प्रायव्हेट चालविणार तर बरे होईल.

**सदस्य श्री. नरेश दुर्गानी:–**मागील वेळेस सुध्दा तसेच होते टेंडरींगसाठी कोणीच पुढे यायला तयार नव्हते. प्रथम तर आपण पहा की कोणी ठेका घेण्यास तयार होत आहे? आम्ही मागील वेळेस प्लॉटसह ठेका दिला होता, हा आमचा अनुभव आहे तो फार वाईट अनुभव आहे. सर्व गोष्टी पाहिल्या तर आम्हांस त्याचा तोटाच झाला आहे. तर त्या गोष्टी लक्षात घेवुन आपण पहा.

**सदस्य श्री. दिलीप मिश्रा :–**नगरमध्ये बससेवा चालु आहे. नगरमधील ठेकेदार आले होते, त्यांचे श्री. यशवंत व श्री. लेंगरेकर साहेब यांच्याशी चर्चा झाली. त्यांचे म्हणणे असे आहे की आम्ही बससेवा चालवु व रॉयल्टी सुध्दा महापालिकेस देवु. फक्त पाच बस महापालिकेने त्यांना दयावे. तर आपण तो संदर्भ घेवु शकतो जर या प्रकारचा सिस्टम तयार होत असेल तर महापालिकेस रॉयल्टी सुध्दा मिळेल. तर त्यांना देण्यास हरकत नाही. कारण त्यांच्या नगरमध्ये बसेस चालु आहेत व यशस्वीरित्या बसेस चालल्या आहेत. आपण नगरला भेट सुध्दा देवु शकतो की त्यांची कशी सिस्टम चालु आहे, हे पाहु शकतो. कारण बसेस उल्हासनगरशीच संबंधीत आहे. जर उल्हासनसगर येथुन २० बसेस चालली तर हळुहळु आमचा मार्ग वाढेल. अंबरनाथ–बदलापुर जवळचे शहर आहे, कल्याण–डोंबिवली, न्यु बॉम्बे आधी आरटीओने पारीत केले आहे. १४ मार्ग आहेत तर त्यात सुध्दा चालु शकतात. व ज्या कुणास निविदा देणार तर त्यांना त्या कामाचा अनुभव असला पाहिजे. त्याचा अनुभव पाहुनच आपण निर्णय घेवु शकतो.

**श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त :–** पुर्वी सुध्दा खाजगी ठेकेदारास बसेस चालविण्यास दिल्या होत्या परंतु समस्या निर्माण झाल्यात. पूर्वी ठेकेदारामार्फत चालविण्यात आलेल्या परिवहन सेवेच्या बसेस ठेकेदाराच्या असल्याने मोनोपाली निर्माण झाली होती. पण आता मनपाच्या बसेस असल्याने रॉयल्टी, उत्पन्न विचार करता येईल. जर महापालिका बसेस खरेदी करुन देईल, जवळजवळ ५० कर्मचारीवर्ग लागेल, वाहनचालक, कंडक्टर वगैरे कर्मचारी नेमावे लागतील. व कॉंट्रेक्टर ड्रायव्हर, त्यांचा पगार वगैरे देईल. नगरमध्ये सुध्दा असेच आहे. त्यांच्या एक्स्ट्रा बसेस आहेत. त्यामुळे नागरीकांना लवकरात लवकर सेवा पुरविता येते. नगर सारखे केले तर लोकांचा फायदा होईल. सन्माननिय सदस्यांना मी सांगतो की त्यांनी नगरला जावुन भेट दयावी.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–**आपण नगरला भेट दया. तेथे कशा प्रकारे काम होते, कशा बसेस चालतात. मग निर्णय घ्या. तुमच्याजवळ दोन्ही उद्‌देश आहेत. ठेकेदारांना दिले तर त्यांना अटी, शर्ती ठरवुन दया. पुर्वीच्या केसमध्ये त्यांची बरीच प्रकरणे होती. डीएसआर कोड देणार त्याप्रमाणे महासभा झाली की बसेस खरेदी करु. तुमच्याकडे दोन्ही बाजु आहेत. तुम्ही नगरला जा अधिकारी व आयुक्तांशी आधी चर्चा करा, नंतर नगरसेवकांना भेटा त्यांच्याशी चर्चा करा, नंतर ठेकेदाराशी चर्चा करा.

**सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :–**माझी आयुक्त महोदयांना विनंती आहे की, तेथे जो ठेकेदार ठेका चालवित आहे तर त्याची वायोबलीटी, मिशन ऑफ कंडक्ट कसे आहे. तसा अहवाल तेथिल महापालिकेकडुन मागवुन मग निर्णय घेतला जावा. त्याने स्पष्ट होईल. कॉफीडीअन्शील रिर्पोट आपल्या स्तरावर मागवा.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–**मी त्यांच्याशी बोलेल आपण तेथे जा व त्यांच्याशी मिटींग करा. त्यांचे फिडबॅक घ्या, नंतर तेथे पाहणी करुन आपण पाहु शकता की ते कसे चालवितात. आपली तेथे महापालिकेशी सुध्दा चर्चा होईल व त्याचा फिडबॅक आपणांस मिळेल. तर यात आपले दोन उदिष्ट आहेत जर बाहेर कोणी चांगला ठेकेदार चालवायला भेटला तर बाहेर दयायचे नाहीतर आपण मानधनावर वाहनचालक ठेवुन आपण चालवायचे. तर त्यांचा ठेका काय आहे, जर समजा एखादया ठराविक मेंटेनन्सपर्यंत असले तर त्याने करावे व जर जास्त असेल तर आपण करायचे, अशा सर्व बाबी तेथे जावुन तुम्हांला अभ्यासायला मिळतील. तो ठेकदार रॉयल्टी किती देतो,

उत्पन्न किती येते, सर्व अभ्यास करुन मग आपण ठरवु या. पुर्वीच्या केसमध्ये त्याच्याच बसेस होत्या. त्याचेच सर्व काही होते त्यामुळे तो स्वत: चालवत होता. येथे आता इन्फ्रास्ट्रक्चर आपण उपलब्ध करुन देत आहोत. त्याला फक्त मॅनपॉवर लावुन गाडया चालवायच्या आहेत व फायदा घ्यायचा आहे. तर त्याला जेवढे मिळणार त्यातुन किती टक्के तो महापालिकेला देईल हे सर्व तेथे अभ्यासुन मग आपल्याला हायेस्ट कोड कोण देणार, त्याप्रमाणे निर्णय घ्यावा लागेल. त्यासाठी आपण तेथे पाहणी करुन यावी. महासभा होईल, महासभा झाली की आपण बसेससाठी निविदा मागवुन घेवु या. नंतर तुम्ही तेथे जावुन पाहणी करुन या. जोपर्यंत आपल्या बसेस येतील तोपर्यंत तुमची पाहणी सुध्दा होवुन जाईल. त्यानंतर आपण पुन्हा एकदा सभा लावु मग निर्णय घेवु या.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—</u>ठिक आहे, फारच चांगले.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>दोन्ही बाजु येतील. एक सभा तुम्ही तेथिल आयुक्तांबरोबर घ्या, एक सभा तेथिल प्रतिनिधींबरोबर करा आणि एक सभा तेथिल ठेकेदाराशी करा असे करुन तिन्ही एंगलमध्ये पाहणे होईल.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—</u>सुमोटो असे असले पाहिजे मागील वेळेस जो कटु अनुभव होता तो परत येता कामा नये. आपली बससेवा चालु असली पाहिजे, जनतेचेही भले होवो व महापालिकेचेही नुकसान न होवो.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>हो बरोबर आहे. असे झाले पाहिजे की ही परिवहन समिती आली आणि तिने बस खरेदी करुन चांगली चालवित आहे व लोकांना चांगली सेवा देत आहे असा परिणाम आला पाहिजे.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—</u>मार्चच्या आधी नाहीतर गुढीपाडव्याच्या दिवशी झाले तर बरे होईल.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>हो आता महासभा होवु दया नंतर निर्णय घेवु.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—</u>गुढीपाडव्याला शुभ मुर्हुत आहे.

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :—</u>निविदा कॉलही केली आहे. थेट कंपनीकडून बस खरेदी करावयाच्या आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>कोणत्या कंपनीकडुन करावयाचे आहे?

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :—</u> डीजीएसडी दराने टाटा मोटर्सकडून थेट करावयाचे आहे. ३२ सिटरच्या बसेस येतील.

<u>सभापती श्री. मोहन रामनानी :—</u>तयार बस येतील, त्याचे दर किती?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>जे कायदयात असतील तसे.

<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :—</u> जसे प्रस्ताव आहे तसेच केले आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा :—</u>मार्चपर्यंत बसेस खरेदी करणार, परंतु बस डेपो कोठे बनवायचे आहे. बसडोपोची स्थिती काय आहे, कोठे शेड बनवायचे आणि बसडेपो गॅरेजसमोर असला पाहिजे. या गोष्टीसुध्दा अंतिम केल्या जाव्यात.

<u>सदस्य श्री.परमानंद हिंदुजा:—</u>मी यामध्ये अजुन एक सांगतो की मागील सभेत म्हटले होते उल्हासनगर स्टेशन बाहेर एक मोकळा भुखंड आहे तेथे दोन चार अतिक्रमणे आहेत, आरटीओच्या मार्गात तो नाही आपण जर एका महिन्यात पाठपुरावा कराल तर होईल तेथे सुध्दा बसडेपो विकसित करता येईल. उल्हास स्टेशनपासुन आपण जे काही मार्ग ठरविले त्यात तो नाही. आपण जर तेथे बस डोपो बनविले तर तेथेच बस सुरु होईल व तेथेच थांबेल. एका जागी १,२ व ३ व एका जागी ४,५ व एका जागेहुन सिटी बस चालणार. तर ते आपल्या मार्गात नाही, जेवढे काही आरटीओचे मार्ग पारीत झाले आहेत त्यात हे सुध्दा समाविष्ट करण्यात यावे. तर यासाठी आरटीओच्या मागे लावुन लवकरात लवकर पारीत करण्यात यावे. नाहीतर संपुर्ण ठप्प होईल व म्हणेल की परवानगी नाही आपण तेथुन बस नाही चालवु शकत. आधी जो डेपो बनविला होता तो तर अदयाप दिलेला नाही. आपण जो नविन विचार करत

आहोत उल्हास स्टेशनच्या बाजुला त्यासाठी जी पध्दत आहे ती आरटीओ यांच्याकडुन करुन घ्या. ही फार महत्वाची बाब आहे. नाहीतर बस आल्यानंतर आपण बस चालु करु शकणार नाहीत.

आयुक्त , श्री. मनोहर हिरे :—बस डेपोची तरतुद करावी लागेल.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त :—आपण स्टेटस्को पाहु, आता आपण बसडोपोसाठी दोन्ही बजेटमध्ये तरतुद करु. बसडोपोसाठी बजेटमध्ये तरतुद करावी लागेल.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—तेथे गॅरेज नाही होवू शकत फार मोठा प्लॉट आहे. तेथे पावसाळयात अडचण होईल. पाण्याचा ओव्हर फ्लो होईल. बस डेपोसाठी ती जागा चांगली आहे. आरटीओच्या मार्गाची परवानगी ही आधीच व्हायला पाहिजे होती. बाकी तर तेथे पाहुनच करावे लागेल की महापालिका कोठुन कोठपर्यंत बसेस चालवु शकेल. दुरुस्ती कोठे होईल, गॅरेज कोठे होईल.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा:—बसडेपोसाठी अंदाजे किती खर्च लागेल?

सदस्य श्री. रविंद्र महाजनी:—यापुर्वी झाले होते.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा:—देखभाल दुरुस्तीत समाविष्ट करा.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—कधीही जावु शकता आपण तारीख निश्चित करा. तेथे मी बोलेल.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—हो हे तर पुढील आठवडयात सुध्दा होवु शकते.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—फक्त आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तरतुदीतुन नाही करता येणार.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त :—चालेल

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—यात २ गोष्टी होवु शकतात. एक नगरला भेट दया, दुसरे म्हणजे बसस्टॉपसाठी तरतुद करु. मार्ग पाहु या. महासभा झाल्यावर निविदा कॉल करु या. सचिव मॅडम, महासभा आता कधी लागेल, २० तारखेपर्यंत लागेल ना?

महापालिका सचिव :—होय, साहेब.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—तुम्ही ई टेंडरींग केली तरी दर जास्त येतील त्यामुळे थेट कंपनीस दया.

श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त:—तेच बरे होईल. दर कमी असतील.

श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—टाटा मोटर्सचे दर कमी. निविदा न काढता बस खरेदी केल्यास खर्च कमी येवुन कमी वेळेत बस चालू करण्यात येईल.

श्री.श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त:—त्यांचे बसेस कोठे आहेत?

श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—टुर बस आहेत.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—ट्रॅव्हल्स सारख्या बसेस आहेत.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा:—सीएनजीच्या बसेस चालवा.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त :—सीएनजीचा प्रोब्लेम चालु आहे. त्या बंद पडल्यात.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा:—मुंबई बीएसटीच्या किती बसेस चालु आहेत? बॅटरीवर चालतात ना, त्या सोलार बॅटरीवर संपुर्ण नॅशनवर चालु आहेत.

श्री. जमीर लेंगरेकर, उप—आयुक्त :—होय, ते बॅटरीवर चालतात, बॅटरी चॉर्ज करुन चालवु शकतो.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा:—३१ मार्चच्या आधी बससेवा सुरु झाली पाहिजे. आरटीओची परवानगी शिलफाटयापर्यंत आहेत.

सभापती, श्री. मोहन रामनानी :—निर्णय घ्या कधी?

सदस्य श्री. दिलीप मिश्रा:—बदलापूरपर्यंत घ्या, कल्याण आहे.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा:—तात्पुरती दोन तीन महिन्यापर्यंत हाजीमलंग बस चालविली होती ती आठवडयात फक्त एकदा गुरुवारी चालविली होती. ती लोकांनी भरुन जात होती.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा:—कॅम्प ५ येथुन घ्या.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—इंटरसिटीतुन घ्या.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—आपण कॅम्पवाईज जावु. प्रथम कॅम्प नं. ५ येथुन घेवु. आधी पाहु या कसा प्रतिसाद मिळतो, काय अडचणी येतात, लोकांचा सुध्दा विश्वास वाढला पाहिजे. टप्प्या टप्प्याने बस वाढल्या तर चांगल्या.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा:—ठिक आहे. नगररला भेट देण्याची तारीख तुम्ही ठरवुन दया.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—तारीख तुम्ही ठरवा. तारीख ठरली तर माझ्या सहीचे पत्र तुम्हांला देतो.

सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—सकाळी जावुन परत येणे योग्य होईल की तेथे एक रात्र थांबावी लागेल.

सदस्य श्री. दिलीप मिश्रा :—नाही सकाळी जावुन परत येवु.

सदस्य श्री. नरेश दुर्गानी:—महापालिकेतर्फे एवढया दिवसानंतर जात आहोत तर एक रात्र तेथे थांबले पाहिजे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—तुम्ही ठरवा, उदया परवा कधी जायचे ते. मग नगरला जा, तेथिल दौरा करा. त्यांचा एरिया ५३ चौरस आहे. आपला १३ चौरस मिटर आहे. फारच कमी आहे तरी आपण तेथे जावुन या.

सभापती, श्री. मोहन रामनानी :—आयुक्त साहेबांच्या येण्याने सर्वात लवकरात लवकर निर्णय झाले आहेत. त्यासाठी सर्वांनी टाळया वाजवा. आपण म्हणालात ना की, त्या खाजगी ठेकेदारांना फक्त बसेस चालविण्यासाठी दिल्या जाव्यात व बाकीचा अधिकार हा महापालिकेस असेल. तर त्याच गोष्टी लक्षात ठेवुन प्रशिक्षण झाले पाहिजे. कारण मागील वेळेस काय झाले होते सर्वच अधिकार खाजगी ठेकेदारास देण्यात आले होते. देखभाल, दुरुस्ती व भुखंडसहीत सर्व गोष्टी त्याच्याकडे होत्या. त्याकरीता आज तो भुखंड आपणाकडे नाही.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—करार असा करायचा की, समजा आपण १० बसेस चालवायला घेतल्या, १० बसेसचे जे त्याच्याकडे कलेक्शन येईल तर आपल्याकडे जो रेशो ठरलेला असेल १५ टक्के किंवा जे काही असेल. आपण उदाहरण घेवु या. जो करायला असेल त्याला आपण देवु.

सभापती, श्री. मोहन रामनानी :—मी तेच म्हणत आहे, मागील वेळेस जे झाले तो ठेकेदार म्हणत होता मी तोटयात जात आहे. आता जी निविदा होईल तो ४० टक्के आपणांस देईल तर ती शक्यता कमी वाटत आहे.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—जो करार करु त्याच्याकडुन आपण स्पष्ट करुन घेवु. मागील वेळेस काय झाले की त्याला आपण पैसे दिले परंतु त्याने सर्व्हीस व्यवस्थित दिली नाही.
सदस्य श्री. परमानंद हिंदुजा:—आपल्या महापालिकेचे विक पॉईंट काय होते की त्याने काहीच इन्व्हेस्ट केले नव्हते.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>त्यावेळेस महापालिकेची शुन्य इन्व्हेस्टमेंट होती, आता इन्व्हेस्टमेंट आहे.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा:—</u>आता तर पत्र देवुन आणि लवकरात लवकर ते काम झाले पाहिजे. त्यानंतर महापालिकेस व जनतेस फायदा होईल.

<u>श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त:—</u>ना नफा ना तोटा झाले तरी चालेल.

<u>सदस्य श्री. परमानंद हिंदुजा :—</u>कसेही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>तुम्ही पाहिजे तर नगरला जावुन भेट दया.

<u>महापालिका सचिव :—</u>ठराव पास?

<u>सदस्य श्री. दिलीप मिश्रा :—</u>ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**यावेळी आयुक्तांना सदस्यांनी पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

<u>सभापती, श्री. मोहन रामनानी :—</u>सदर विषयाबाबत पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यात येत आहे 

☑ **विषय:—** सन २०१५—१६ चे सुधारीत व २०१६—२०१७ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणे.

## प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारात घेऊन "ब" अर्थसंकल्पीय अंदाज परिवहन समितीने तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजीत परिवहन उपक्रमाचे संपादन, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन चालविणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल या अधिनियमान्वये दायी असेल अशा सर्व रक्कमा आणि मुद्दल व व्याज यांचे हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबाबत तरतुद केली पाहिजे. महानगरपालिकेने परिवहन उपक्रम खाजगी सहभागाने राबविण्याचे योजले असून अधिनियमातील तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०१५—२०१६ चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व वर्ष २०१६—१७ चे मूळ अंदाज पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ. क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2015—16 मूळ अंदाज | वर्ष 2015—16 सुधारित अंदाज | वर्ष 2016—17 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2015—16 मूळ अंदाज | वर्ष 2015—16 सुधारित अंदाज | वर्ष 2016—17 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 2500 | —— | 2500 | 1 | परिवहन सेवा खर्च | 15000 | —— | 5000 |
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | 75400 | —— | 12000 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 2398 | 600 | 1000 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 35323 | 600 | 8500 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | 1000 | —— | 1000 |
| | | | | 4 | बस खरेदी | 94825 | —— | 16000 | |
| | **एकूण** | **113223** | **600** | **23000** | | **एकूण** | 113223 | 600 | 23000 |

वर्ष २०१५—२०१६ व २०१६—१७ करिता उत्पन्न खर्चाचे अंदाज लक्षात घेता रहाणारी तुट "अ" अंदाजपत्रकातुन वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे परिवहन उपक्रमासमोर सादर करण्यात येत आहे.

परिवहन समिती ठराव क्र. ९ दिनांक :– ०६/०२/२०१६

सूचकाचे नाव :– १) श्री. रवींद्र महाजन,
२) श्री. परमानंद हिंदुजा
अनुमोदकाचे नाव :– १) श्री. दिलीप मिश्रा
२) श्री. होम नारायण वर्मा

ही परिवहन समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ मधील सर्व तरतुदीस अधीन राहुन वर्ष २०१५–२०१६ चे सुधारीत व वर्ष २०१६–२०१७ करिता परिवहन व्यवस्थापकांचे अदांज विचारात घेवुन परिवहन उपक्रमाचे पुढील प्रमाणे अदांजपत्रक मंजुर करीत आहे.

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2015–16 मूळ अंदाज | वर्ष 2015–16 सुधारित अंदाज | वर्ष 2016–17 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2015–16 मूळ अंदाज | वर्ष 2015–16 सुधारित अंदाज | वर्ष 2016–17 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 2500 | –– | 2500 | 1 | परिवहन सेवा देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | 15000 | –– | 15000 |
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | 75400 | –– | 15000 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 2398 | 600 | 1000 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 35323 | 600 | 19500 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | 1000 | –– | 1000 |
| | | | | | 4 | बस खरेदी व बस डेपो खर्च | 94825 | –– | 20000 |
| | एकूण | 113223 | 600 | 37000 | | एकूण | 113223 | 600 | 37000 |

उत्पन्न व खर्चाचे अदांज लक्षात घेता राहणारी तुट ''अ'' अदांजपत्रकातुन वर्ग करण्यास मजुंरी देत आहे.

या ठरावाअंतर्गतचा निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याचा वाट न पाहता थेट अमंलात आणण्यात येईल.

सूचकाची सही /–

अनुमोदकाचे सही /–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ४.४५ वाजता सभापती श्री. मोहन रामनानी यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

( प्राजक्ता कुलकर्णी )
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२५/१०/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २५/१०/२०१६ रोजीच्या परिवहन समितीच्या सभापती नियुक्ती संदर्भातील निवडणूक सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन समितीची सभा मंगळवार दिनांक २५/१०/२०१६ रोजी दुपारी १२.३० स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | श्री. मोहन हरीराम रामवाणी (लास्सी) |
| २ | श्री. सुनिल सुर्वे |
| ३ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी |
| ४ | श्री. राजु काशिराम चिकणे |
| ५ | श्री. रामजीत पाल |
| ६ | श्री. कुलदीप गुरुदाससिंग ऐलसिघांनी |
| ७ | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा |
| ८ | श्री. भगवान मोहिते |
| ९ | श्री. किसन प्रितमदास भाटीया |
| १० | श्री. दिपक दयालदास छतलानी |
| ११ | श्री. मनोज पाटील |
| १२ | श्री. भावेश चेलानी |
| १३ | श्री. अंबदास गोरख पालवे |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्री. विकास गजरे, उप जिल्हाधिकारी, ठाणे
३. श्रीमती विजया कंठे, उप—आयुक्त, मुख्यालय
४. श्री. प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
६. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत

२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १ वाजुन ५५ मिनिटांनी सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये परिवहन समिती सभापती पदाची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. **डॉ. महेंद्र कल्याणकर**, जिल्हाधिकारी, ठाणे हे आहेत.

मी विषय क्र. १ वाचुन दाखविते.

---

⇨ **विषय क्र. १** :— परिवहन समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी (पीठासीन अधिकारी):—

**परिवहन समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक १८/१०/२०१६** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ४ नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाली असून ती अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत:—

| अक्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी | श्री. मनोज पाटील | श्री. भगवान नारायण मोहिते |
| २ | श्री. कृष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी | श्री. भगवान नारायण मोहिते | श्री. मनोज कैलासनाथ पाटील |
| ३ | श्री. दिलीप वशिष्ठमुनि मिश्रा | श्री. कुलदीप गुरुदाससिंग ऐलसिघांनी | श्री. किसन प्रितमदास भाटिया |
| ४ | श्री. मोहन हरीराम रामवाणी | श्री. रामजीत पाल | श्री. भावेश के. चेलानी |

**परिवहन समिती सभापती** पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे (मराठी वर्णानुक्रमाने आडनावाने सुरूवात करून)पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. तिवारी कृष्णदत्त परमेश्वरदिन |
| २. | श्री. मिश्रा दिलीप वशिष्ठमुनि |
| ३. | श्री. रामवाणी मोहन हरीराम |

यावेळेस दुपारचे ०२ वाजुन ०० मिनिटे झाली आहेत.

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील (**प्रपत्र ३ मधील**) अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता दुपारचे ०२ वाजून १५ मिनीटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली १५ मिनीटांची वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दुपारी ०२ वाजुन ०६ मिनिटांनी श्री. मिश्रा दिलीप वशिष्ठमुनि या सदस्याने आपली उमेदवारी मागे घेतली.

आता, परिवहन समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. तिवारी कृष्णदत्त परमेश्वरदिन |
| २. | श्री. रामवाणी मोहन हरीराम |

परिवहन समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १, आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा–या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ''होय'' म्हणुन नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम परिवहन समिती सभापती पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. तिवारी कृष्णदत्त परमेश्वरदिन यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. तिवारी कृष्णदत्त परमेश्वरदिन यांना मतदान करु इच्छिणा–या सदस्यांनी आपला हात वर करावा:–

मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १. | श्री. सुनिल सुर्वे |
| २. | श्री. कुष्णदत्त परमेश्वरदिन तिवारी |
| ३. | श्री. राजु काशिराम चिकणे |
| ४. | श्री. भगवान मोहिते |

| | |
|---|---|
| ५. | श्री. मनोज पाटील |
| ६. | श्री. अंबादास गोरख पालवे |

त्यानंतर परिवहन समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्री. रामवाणी मोहन हरीराम यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. रामवाणी मोहन हरीराम यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १. | श्री. मोहन हरीराम रामवाणी |
| २. | श्री. रामजीत पाल |
| ३. | श्री. दिलीप वशिष्टमुनी मिश्रा |
| ४. | श्री. किसन प्रितमदास भाटीया |
| ५. | श्री. दिपक दयालदास छतलानी |
| ६. | श्री. भावेश चेलानी |

परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणकीमध्ये ज्या सदस्यांनी मतदान केले नाही अशा सदस्यांच्या मताची नोंद पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १. | श्री. कुलदिपसिंग गुरुदाससिंग ऐलसिंघानी |

परिवहन समिती सभापती पदासाठी दोन्ही सदस्यांना मिळालेली मते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. तिवारी कृष्णदत्त परमेश्वरदिन | ०६ |
| २. | श्री. रामवाणी मोहन हरीराम | ०६ |

| | |
|---|---|
| एकुण मतदान संख्या – | १२ |
| तटस्थ | ०१ |

आता दोन्ही सदस्यांना समसमान मते मिळाल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–८ मधील तरतुदीनुसार निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे करण्याचे घोषित करण्यात आले. त्यानंतर उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले पालिका सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडुन चिठ्ठी काढण्याचे ठरल्याने महापालिका आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर यांच्याकडुन चिठ्ठी काढण्याचे सर्व सदस्यांनी ठरविले त्यानंतर चिठ्ठी काढण्यात आली.

# निकाल घोषणा

मी श्री. रामवाणी मोहन हरीराम यांच्या नावाची चिठ्ठी निघाल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये ***श्री. रामवाणी मोहन हरीराम*** यांची **परिवहन समिती सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे जाहिर करतो.

दिनांक :–२५/१०/२०१६

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी

स्थान :– स्थायी समिती सभागृह

यावेळी दुपारी २.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**मान्य**

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी